राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशत:/पूर्णत:
अनुदानित माध्यमिक,उच्च माध्यमिक शाळा,
उच्च माध्यमिकचे वर्ग/कनिष्ठ महाविद्यालये व
सैनिकी शाळांसाठी शिक्षकेतर पदे सुधारित
आकृतिबंधाच्या अधीन राहून केवळ तात्पुरत्या
स्वरुपात भरण्यास मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय, क्रमांक : एसएसएन १७०२/(१६०/०२)/माशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ६ फेब्रुवारी २००४.

वाचावे :-१) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन २६९४/१७९०/(१६४)/माशि-२, दि. २८ जून १९९४
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा,दि. १० सप्टेंबर २००१.
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एसएसएन २६९५/(३९६/९५)/माशि-२, दि. ३१ डिसेंबर २००२.
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र.एसएसएन २६०३/(४१/०३)/माशि-२, दि. २४ एप्रिल २००३.
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र.एसएसएन २६०३/(४१/०३)/माशि-२, दि. २१ नोव्हेंबर २००३.
६) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग , क्र. विपसू २००३/(५३/०३)/शिकाना/माशि-२, दि. १६.१२.२००३.

**प्रस्तावना :-**

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशत:/पूर्णत:अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकचे वर्ग/कनिष्ठ महाविद्यालये व सैनिकी शाळांसाठी शिक्षकेतर पदे अनुज्ञेय करण्याकरिता सुधारित निकष शासनाच्या संदर्भिय दि. २१.११.२००३ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आले होते. सदर शासन निर्णय शासनाने दि. १६.१२.२००३ रोजी रद्द केल्यामुळे राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशत:/पूर्णत: अनुदानित शाळांमध्ये शिक्षकेतर पदे भरण्यावर वित्त विभागाच्या दि. १० डिसेंबर २००१ च्या शासन निर्णयाप्रमाणे पूर्ववत निर्बंध आलेले आहेत. त्यामुळे ज्या शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सर्व पदे रिक्त आहेत अशा शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यास नवीन सुधारित

आकृतीबंधाच्या अधीन राहून केवळ तात्पुरत्या स्वरुपात परवानगी देण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशत:/पूर्णत: अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकचे वर्ग/कनिष्ठ महाविद्यालये व सैनिकी शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी लिपिक व चतुर्थश्रेणी कर्मचारी या संवर्गातील मंजूर (म्हणजे सक्षम प्राधिकाऱ्याने निकषानुसार ज्या पदाना मान्यता दिलेली होती) असलेली सर्व पदे रिक्त असल्यास या दोन संवर्गातील प्रत्येकी एक पद नवीन सुधारित आकृतीबंधाच्या अधीन राहून केवळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मंजूरी देण्यात येत आहे :-

१) शिक्षकेतर कर्मचाऱ्याचे लिपिक व चतुर्थश्रेणी कर्मचारी हे दोन संवर्ग वगळता अन्य उदा. ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहायक या संवर्गातील पद भरण्यास तूर्त मंजूरी नाही.

२) ज्या शाळांमध्ये शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय शिक्षकेतर कर्मचाऱ्याचे कोणतेही पद भरले असल्यास अशा पदास मंजूरी दिली जाणार नाही.

३) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा नवीन आकृतीबंध लागू झाल्यानंतर त्यानुसार सदर पद अनुज्ञेय न झाल्यास ते व्यपगत होईल व त्या पदावरील व्यक्तीची नियुक्ती रद्द होईल.

४) ही रिक्त पदे भरताना प्रथम अनुकंपा तत्वावरील उमेदवारांना प्राधान्य द्यावे तसेच मागासवर्गीयांसाठीचे आरक्षणविषयक सर्व आदेशांचे पालन करावे.

३. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५९/०४/ व्यय-६, दि. १३ जानेवारी २००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संगणक संकेतांक २००८१२१८११५८४८००१

( सु. वि. पाटील )
उपसचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति,
शिक्षण संचालक (माध्य.व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य,पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, पुणे.
संचालक, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, पुणे.
शिक्षण संचालक (प्रौढ), महाराष्ट्र राज्य, पुणे.